(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार

**सबा समीर शिरगुप्पी,** कमला कॉलेज, कोल्हापूर.

---

सत्य, अहिंसा आणि स्वावलंबन हा महात्मा गांधीजींचा दृष्टीकोन तर जगजाहीर आहेच. नैतिकतेचे महत्व राजकारणामध्ये जेवढे महत्वाचे आहे तितकेच ते अर्थव्यवस्थेमध्ये आहे हे ही त्यांनी आपल्या आचरणामधून पटवून दिलेले आहे.

नैतिकतेच्या जोरावरआपण खरी आणि चांगली अर्थव्यवस्था स्थापितकरू शकतो असे त्यांचे म्हणणे होते. गांधीजींच्या आर्थिक विचारावरील महत्वाचे दृष्टीकोन कसे होते हे आपण जाणून घेऊया.

**1) महात्मा गांधी यांची विश्वस्त कल्पना :**

गांधीजींचा ट्रस्टीशिपचा सिध्दांतअसा सांगतो की, एखाद्या व्यक्तीला संपत्ती ही उत्तराधिकारी म्हणून मिळाली असो वा व्यापारातून मिळालेली असो. त्याचा व्यक्तीने स्वत:ची जेवढी गरज आहे तेवढी संपत्ती स्वत:जवळ ठेवावी. बाकीच्या संपत्तीचा ट्रस्ट करावा व त्या ट्रस्टच्या माध्यमाने त्या संपत्तीचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी करावा . दर्जेदार स्कूल, हॉस्पीटल्स सुरु करावेत .

महात्मा गांधीजीनी सर्वोदयी कल्पना केली होती. या कल्पनेमध्ये सर्व लोकांचे हित व कल्याण पाहिले जाते. सर्व लोकांची उन्नती व्हावी व भारताची आर्थिक, सामाजिक ,राजकिय समस्यांचेनिराकरण करण्यासाठी महात्मा गांधीजी द्वारा चालविलेले हे एक सार्वजनिक आंदोलन आहे. आणि याचा उद्देश समाजाला असे रूप देणे आहे की, आर्थिक विषमता, दरिद्रता कमी व्हावी , शोषण् थांबावे व समाज सर्वार्थाने सुखी व्हावा.

आपण पाहतोच आहे की रतन टाटा , यांच्यासारखे उद्योगपती आपली काही संपत्ती समाजाच्या कल्याणासाठी वापरतात. आणि म्हणून जनतेला ही त्यांच्याविषयी आदराची भावना आहे.

**2) महात्मा गांधीयांचे आर्थिक विचार –**

आधी भारतावर ब्रिटीशांचे साम्राज्य होते. त्यांनी शेतक-यांवर कर बसविले, दडपशाही वृत्तीने गरीबांचे शोषण केले. त्यामुळे सगळीकडे आर्थिक दरिद्रता पसरली. आर्थिक असमानता वाढत गेली. अन्याय, अत्याचार, बेरोजगारी व उपासमार वाढत गेली. पाश्चिमात्य देशात जे औद्योगिकरण झाले, त्याचा परिणाम भारतावर झाला. भारतातून कच्चा माल इंग्लंडला नेला जात होता. व तेथून पक्का माल भारतात आणला जात होता.भारतात जो कुटीरउदयोग होता त्यामुळे भारत आत्मनिर्भर होता , समाज बांधला गेला होता. परंतु औद्योगिकरणाने हे सर्व लोक कामगार बनू लागले. काहींची शेती हडपली गेली होती. त्यामुळे जनतेसमोर कामगार बनण्याशिवाय दुसरा पर्यायही नव्हता. त्यामुळे भारताच्या ख-या अर्थव्यवस्थेचा जो सिध्दांत होता, तो नष्ट झाला होता.

अशा परिस्थितीत गांधीजींचे असे मत होते की, खरी अर्थव्यवस्था सामाजिक न्यायावर आधारीत असायला हवी व त्यावरच प्रत्येक व्यक्तीचे सामाजिक हित जपले जाते. गांधीजीनी गरीब आणि श्रीमंतामधील दरी कमी करण्याचा प्रयत्न केले . प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात गरजेनुसार गोष्टींचा उपयोग केला पाहिजे.

कोरोना काळात गरीब लोकांकडे काम नव्हते. दोन वेळचे अन्न खायला मारामार होती. गरीब लोक अधिक गरीब बनले तर श्रीमंत लोक चक्क कोरोना काळात सर्वाधिक श्रीमंत बनले. पैसे मिळविण्यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु झालेली दिसते .गेल्या 2000 वर्षात जेवढी नैतिकतेची हानी झाली नाही तेवढी आज झालेली दिसते आहे. गरीब व श्रीमंतामधील जी दरी कमी करण्याचा गांधीजींचा दृष्टीकोन होता त्याच्या एकदम उलट आत्ताची परिस्थिती आहे. बेरोजगारी ,कर्जबाजारीने थैमान घातले आहे. शिक्षण आहे पण नोक-या नाहीत. महागाई तर आकाशाला भिडलेली आहे. हिंसा वाढलेली आहे आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे सत्तेचे आणि भारतीय संपत्तीचे केंद्रीकरण झाले आहे काय असे वाटते . जे महात्मा गांधीजींना अपेक्षित नव्हते . कारण त्यांचे असे मत होते की,उत्पादन आणि संपत्तीवर जनतेचा अधिकार आहे.

**3) महात्मा गांधी यांचे स्वदेशी विषयक विचार :**‘समाजात धनाला प्रतिष्ठा आहे म्हणून धनिकांनाही प्रतिष्ठा आहे. त्याचबरोबर श्रमाला प्रतिष्ठा द्यावी म्हणजे श्रमिकांनाही प्रतिष्ठा लाभेल ’

असा गांधीजींचा दृष्टीकोन होता. प्रत्येक व्यक्तीला उपजीवीकेचे साधन उपलब्ध झाले पाहिजे असे त्यांचे मत आहे.

गांधीजींनी आत्मनिर्भर भारताची कल्पना केली होती. आणि म्हणूनच त्या काळी कुटीरउद्योग, लघुउद्योगाची स्थापना केली गेली. गांधीजींनी विदेशी वस्तूंचा बहिष्कार केला.

आता हे विचारआजच्या काळातही तंतोतंतलागू पडतात. कारण चीनकडून भारतीय सिमेला धोका आहे हे माहित असूनही सरकारी वरदहस्ताने चीनकडून आयात वाढलेली आहे. अगदी प्रत्येक घराघरात लागणा-या जसे की, केस विंचरण्याचे कंगवे, गॉगल, डेकोरेशनचे इलेक्ट्रीक दिवे, आणि बरेच काही अगदी कमी दरात उपलब्ध आहेत. अगर याच गोष्टीचे बनवायचे कारखाने आपल्या देशात सुरु झाले तर आपल्या जनतेला रोजगार मिळेल व गांधीजींना अपेक्षित असलेले स्वावलंबन जपले जाईल आणि पुढे जाऊन याच गोष्टी आपलयाला बाहेरील देशात निर्यातही करता येतील व आपला जागतिक व्यापारही वाढीस लागेल. हेच काम (उद्योग) भारताने सुरु केले असते तर कित्येक बेरोजगारांना कामही मिळाले असते.

**4) हातमाग आणि लघुउद्योग विषयक विचार :**

गांधीजींचा व्यापक प्रमाणातील औद्योगिकरण व मशिनीकरणाला विरोध होता. कारण मशिनीकरणाने कामगारांच्या हातचे काम हिरावून घेतले जाते असे त्यांचे विचार होते आणि म्हणूनच त्यांनी त्या काळी हातमाग व लघुउद्योगांना प्रोत्साहन दिले यामुळे विकेंद्रीकरण अर्थव्यवस्थेची स्थापना होते आणि यांच्या जोडीला तर स्वदेशी दृष्टीकोन आला तर सर्वांचेच हित साध्य होते असे त्यांचे मत होते.

आत्ताच्या काळात छोटया उद्योगधंदयाला जी.एस.टी. मुळे त्रस्त केले आहे. नुकत्याच आलेल्या रिपोर्टनुसार मोठमोठे उद्योगपती यांना जीएसटी चा फटका खूप कमी, पण छोटे व्यापारी व उद्योगांना मोठा फटका बसला आहे. हा मोठा विरोधाभास आहे. या छोटया छोटया व्यापा-यांना सरकारच्या पाठींब्याची आणि प्रेरणेची खूप गरज आहे असे वाटते.

**5) म. गांधी यांचे उद्योग व्यापारविषयक विचार :**

मोठया उदयोगधंदयाना कच्चा माल आणि मोठया बाजाराची आवश्यकता असते पण त्यामुळे हळू हळू साम्राज्यवाद पसरू लागतो . समाजामध्ये स्वार्थभाव ,द्वेष भाव बळावू लागतो यामध्ये नैतिक मूल्ये पायदळी तुडवली जातात राजनितिक शक्तीचे केंद्रीकरण होते. समाजामध्येअसमानता पसरतेअसे, त्यांचे मोठया औद्योगिकीकरण आणि मशिनीकरणाविषयी मत होते . मोठया उद्योगामुळे आर्थिक समाजिक समस्यांचा जन्म होतो. मशिनीकरणाने लोक बेरोजगार होतात म्हणून गांधीजींचा याला विरोध होता.

आत्ताच्या काळातही मोठेमोठे उद्योग हे अगदी मोजक्याच उद्योगपतीच्या हातात आहेत या उद्योगांमध्ये पैसा सरकारचा व लोकांचाही अडकलेला असतो. जर या उद्योगांच्या शेअर्सची किंमत या ना त्या कारणाने कमी होते तेव्हा लोक अक्षरश: देशोधडीला लागतात आणि देशाचेही आर्थिक नुकसान होते . जर देशातील बहुसंख्य जनतेचा विकास व्हायचा असेल तर मोठया उद्योगांऐवजी लहान उद्योगांना प्राधान्य दिले पाहिजे.

**6) महात्मा गांधी यांचे राजकिय आर्थिक तत्वज्ञान –**

राजकिय स्तरावर म.गांधींनी स्वराज आणि स्वदेशी सरकारला पाठिंबा दिला आणि त्यांनी विदेशी सत्ता आणि त्यांची राज्यवयवस्था चा विरोध वेळोवेळी मोठया स्तरावर केला . सत्तेचे विकेंद्रीकरणच ख-या अर्थाने समाजाचा विकास घडवून आणू शकतो असे त्यांचे मत होते. गांधीजीनी भारतामध्ये लोककल्याणकारी स्वदेशी व्यवस्थेला एक आदर्श व्यवस्था म्हणून प्रस्तुत केली. जिला रामराज्य म्हणून ओळखले जाते. गांधीजीच्या स्वदेशीचा मुख्य उद्देश जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात भारताला स्वतंत्र तसेच आत्मनिर्भर भारत म्हणून विकसित करणे हे होते.

गांधीजींनी सत्य अहिंसा आणि सत्याग्रहाच्या माध्यमातून हिंसा आणि अत्याचाराचा प्रतिकार केला. गांधीजी हे शुध्द राजकिय विचारक नव्हते तर व्यावहारिक पुरुष होते. गांधीजी राजनीतीला एक नैतिक साधन

मानतात. जे धार्मिक व नैतिक लक्ष साध्य करण्यासाठी आवश्यक आहे त्यांचे असे मत होते की राजकीय क्षेत्रात साधन आणि साध्य दोन्ही समान रूपात पवित्र असले पाहिजे. चांगलया साधनांनीच उचित साध्य साधता येते.

पण आजच्या काळातील राजकीय क्षेत्रात हा विरोधाभास आढळतो . फार कमी लोक नैतिक मुल्यांना धरून असतात. सर्वातील भ्रष्ट क्षेत्र राजकारण बनले आहे. स्वैराचार ,स्वार्थ, पैशांच्या हव्यासापोटी नैतिक विचारांना मज्जाव लागलेला दिसतो आणि म्हणूनच गांधीजींच्या नैतिक विचारांना पुन्हा समाजामध्ये रूजवण्याची गरज भासू लागली आहे.

**7) गांधीजींचे समाजवाद विषयक विचार :**

गांधीजी पुंजीवादाच्या स्थानी समाजवादीअर्थव्यवस्थेला महत्त्व देतात कारण पुंजीवादी व्यवस्था स्वत:च्या लाभावर आधारित असते याच्या उलट जी समाजवादी अर्थव्यवस्था आहे ती पूर्ण समाजाला घेऊन चालते. धनिक लोक वस्तूंची किंमत स्वत: ठरवतात. कोणत्या स्तराचा असेल हे ठरतात त्यामुळे त्यांचा फक्त फायदा होतो . समाजाची हानी होते. पुंजीवादी लोकांचा सामाजिक हिताचा काही एक संबंध नसतो त्यांना फक्त आणि फक्त आपला व्यापार वाढवायचा असतो यासाठी ते मशिनीकरणाचा उपयोग करतात व कामगारांचे शोषण करतात व उपभोक्त्यांचे शोषण करतात . मशिनीकरणामुळे कामगारांची किंमत कमी होते . कमी पैशात काम करायला तयार होतात. पुंजीवादी लोक समाजामध्ये एकाधिकार निर्माण करतात. हे लोक लहान सहान गरीब लोकांना बाजूला करतातत. समाजामध्ये आर्थिक विषमता पसरते समाजामध्ये असंतोष पसरतो.

आज भारतामध्ये जी 40 %संपत्ती आहे त्यावर फक्त 1% लोकांचा अधिकार आहे हे अत्यंत चुकीचे व भयावह आहे आणि म्हणूनच असा समाज जेथे समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विचार होतो अशा समाजवादी अर्थव्यव्यवस्थेचे गांधीजी पुरस्कर्ते होते.

**8) विश्वशांती आणि महात्मा गांधी :**

गांधीजीच्या मते आयुष्याचे सार म्हणजे सत्याचा शोध आणि सत्याचा शोध हा अहिंसेच्या मार्गानेच लागू शकतो. गांधीजींना दुस-या धर्माविषयी आदर होता. आणि आत्मशुध्दीविना अहिंसा धर्माचे पालन अशक्य आहे असे त्यांचे मत होते.

साधी राहणी, चारित्रयसंपन्नता या विचारांच्या जोरावर त्यांनी इंग्रजांना भारताबाहेर हाकलून लावण्यात या मिळविले आणि म्हणून गांधीजीच्या या विचारांचे चाहते सर्व जगभर आहेत. सत्य ,अहिंसा आणि नैतिकतेच्या जोरावर च आपण कोणतीही लढाई लढू शकतो अन्यथा संपूर्ण जगाला न भरून निघणा-या नुकसानीस सामोरे जावे लागेल.जगातील कित्येक नोबेल पुरस्कार विजेत्यांनी असे आवाहन केले आहे की, संपुर्ण जगातील शोषण आणि विश्वयुध्द समाप्त होणेसाठी जगाने गांधीमार्गाचा अवलंब केला पाहिजे. हाच एकमेव मार्ग आहे.

**निष्कर्ष** –

1) भारतामध्ये आर्थिक विषमता आजही दिसून येते.

2) 2टक्के लोकांच्या हातामध्ये भारतातील उद्योग व्यवसाय एकवटलेला दिसतो.

3) महात्मा गांधी यांची आर्थिक, उदयोग व्यवसाय विषयक संकल्पना आर्थिक विषमता दूर करण्यास उपयुक्त आहे.

**संदर्भ** -

1) हिंद स्वराज्य – संपादक

2) आर्थिक विचारांचा इतिहास - डॉ. पाटील जे. एफ. फडके प्रकाशन 2020

3) महात्मा गांधी -- ठाकूरदास बंग